# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा 26 दिनांक :- 14/02/2020**

| क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. स्थायी समिती सभा सुचना क्र.23 सभा सुचना क्र.24 दि. 21/01/2020 व सभा सुचना क्र.25 दि. 30/01/2020 चे चे रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा सुचना क्र.23 सभा सुचना क्र. 24 दि. 21/01/2020 व सभा सुचना क्र. 25 दि. 30/01/2020 रोजीचे रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करणेंस सभेने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सचिन देसाई सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महिलांना मेमोग्राफी (Memograph) तपासणीकरीता 400/- रुपये व पॅप स्मीअर (Pap Smear) तपसणीकरिता 100/- रुपये अर्थसहाय्य देणेबाबत. | ठराव :- सदरच्या विषयावर सभागृहात झालेल्या सविस्तर चर्चानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महिलांना मेमोग्राफी (Memograph) तपासणीकरीता ९00/- रुपये व पॅप स्मीअर (Pap Smear) तपासणीकरीता १५०/- रू. गायनॉकोलोजीस्ट एक्झाम फी (Gynocologist Exam Fee) 100/- रू. असे दि. 29/11/2019 रोजी पत्रान्वये संजीवनी हॉस्पीटल यांनी कळविले आहे. त्यानुसार महिला व बालकल्याण समितीने शिफारस केल्यानुसार मेमोग्राफी (Memography) तपासणीकरीता 400/- रू. व पॅप स्मीअर (pap Smear) तपासणीकरीता 100/- रू. अर्थसहाय्य महानगरपालिका हद्दीतील महिलांना द्यावे. तसेच वेळोवेळी महानगरपालिका हद्दीतील इतर हॉस्पीटलने त्यांच्या हॉस्पीटलमध्ये मेमोग्राफी (Memography व पॅप स्मीअर (pap Smear) तपासणी करण्यांत महिलांना अर्थसहाय्य देण्याबाबत कळविल्यास संबंधित हॉस्पीटलचे सर्व कागदपत्रे तपासून त्या हॉस्पीटलमध्ये येणाऱ्या महिलांना मेमोग्राफी (Memography) व पॅप स्मीअर (Pap Smear) तपासणीकरीता वरील दराप्रमाणेच अर्थसहाय्य द्यावे. तसेच सदर खर्च सन 2019-20 व सन 2020-21 च्या मंजूर होणाऱ्या अर्थसंकल्पातील तरतुदीतून करण्यात यावा. या योजनेकरीता मेमोग्राफी (Memorgraphy) करीता 13,80,000/- रू. व पॅप स्मीअर (pap Smear) करीता 3,45,000/- रू. असे दोन्ही मिळून 17,25,000/- रू. येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. तसेच सदरची योजना दरवर्षी मंजूर होणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन राबवावी व कायम स्वरूपी राबविण्याकरीता आजची सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज ठाकूर सूचक :- मा.श्रीम.ज्योती धोंडेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 3. | वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दीत बालनाट्य महोत्सव आयोजित करणेबाबत. | **ठराव :-** सदरच्या विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील बाल प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याकरीता व नाटकांच्याद्वारे त्यांचे व्यक्तीमत्व घडवण्याचा प्रयत्न करणेबाबत बालनाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे. गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार बालनाट्य महोत्सवाचे आयोजन करावे. तसेच एका प्रयोगाकरीता संस्थेला 20,000/- रू. मानधन देण्यात यावे. या देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये नाटकांचे नेपथ्य (सेट), संगीत, कपडे, लाईट ऑपरेटर, साऊंड ऑपरेटर इ. संस्थेचे राहील. तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता लागणारे इतर साहित्य गोषवाऱ्यात नमूद केल्यानुसार महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर ठेकेदारांमार्फत घ्यावे. तसेच सदर खर्च सन 2019-20 व सन 2020-21 च्या मंजूर होणाऱ्या अर्थसंकल्पातील तरतुदीतून करण्यात यावा. याकरीता अंदाजे येणाऱ्या 4,50,000/- रू. खर्चास आजची सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अफीफ शेख सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 4. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुस्तिका छपाई करण्यास येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून महिला व बालकल्याण समिती सभेने शिफारस केलेनुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमधील नागरीकांपर्यंत महिला व बालकल्याण विभागाची जास्तीत जास्त माहिती पोहचावी, याकरीता 5000 नग महिला व बालकल्याण विभागाच्या योजनेची माहिती पुस्तीका छपाई करण्यात यावी. तसेच सदर खर्च सन 2019-20 व सन 2020-21 च्या मंजूर होणाऱ्या अर्थसंकल्पातील तरतुदीतून करण्यात यावा. याकरीता 5000 नग माहिती पुस्तके छपाई करण्याकामी अंदाजे येणाऱ्या 16,45,000/- रूपये खर्चास आजची सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.ज्योती धोडेंकर सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. 76 मध्ये वालीव मधील यशोदानगर येथील वालीव नाका-वसई फाटा मुख्य रस्त्यावरील शालीमार हॉटेल त श्री गजानन विनायक हाउसींग सो. पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. सदर कामाच्या रक्कम रू. 40,19,189/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. ह्याकामी निविदा दर मागविणेंत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सचिन देसाई सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 6. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पू) हद्दितील रानळे तलाव, भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर परिक्रमा व नौकविहार केंद्र (मनवेलपाडा तलाव ) व मोरेगाव तलाव हया तलावात रंगीत कारंजे बसविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामाच्या रू.63,18,900/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुदेश चौधरी सूचक :- मा.श्री. हार्दिक राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. 75 मध्ये सातीवली येथे मनीष टोकरे यांचे घर ते धुरी इंड कल्व्हर्ट पर्यंत आर. सी. सी. भिंत बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामी होणाऱ्या रक्कम रू.54,44,586/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.प्रकाश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) प्रभाग क्र.59 मध्ये झेड .पी झकेरीया शाळा ते रिझवान हॅरिस कॉलेजपर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रू. 12,85,151/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक,प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश चौधरी सूचक :- मा.श्री.शुभांगी गायकवाड**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. 88 मध्ये फादरवाडी नाका येथे फादरवाडी नाका ते विद्याविकसीने शाळेपर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.श्री. सद्गुरू कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.86% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. या कामी मनपा तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 10. | सन 2018-19, 2019-20 व 2020-21 या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्भव (टप्पा - 1 व 3) 100 द.ल.ली क्षमता योजनेच्या मासवण व धुकटन येथील सब स्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पपींग मशिनरी व जलशुध्दीकरण केंद्रामधील यांत्रीकी बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असून उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे.ऍशलॉन एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील दर हा इतर निविदा दरांपेक्षा कमी असून योग्य व वाजवी असल्यामुळे महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या लघुत्तम दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी मनपा. तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून मे.ऍशलॉन एंटरप्रायजेस यांच्या समवेत संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सचिन देसाई सूचक :- मा.श्री.अफीफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास वैयक्तिक सुरक्षा साहित्य (फायर सुट) पुरवठा करणे कामी प्राप्त दरामधील कमी दराच्या ई-निविदाकाराबरोबर संविदा करणे बाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. निविदेतील घटक क्र. 2 फायर सूट साहित्याचे वाटाघाटीचे दरास निविदा समितीने मंजूरी दिली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये कमी दराचे ई-निविदाकार "मे. फॉर यूवर रेस्क्यू प्रा.लि." यांचेबरोबर संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफीफ शेख सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | अग्निशमन विभागास 70 मीटर ±10 %उंचीचे टर्न टेबल लॅडर अग्निशमन वाहन फॅब्रिकेशन करुन वाहन खरेदी करणे कामी कमी दराच्या ई-निविदाकाराबरोबर संविदा करणे बाबत. | ठराव :- महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी 70 मी.अधिक वजा 10% उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहन खरेदी करणे कामी प्राप्त निविदामधील कमी दराचे निविदा दराबाबत व निविदाकाराने दिलेले वाटाघाटीचे दर व इतर सेवा याबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. प्राप्त दरामध्ये वाटाघाटी करण्यांत आल्या असून त्याद्वारे प्राप्त झालेले दर निविदा समितीने मान्य केलेले आहेत. वाहन विदेशातुन आयात होणार असल्याने त्याबाबत लागणारी कस्टम ड्यूटी ही भारतीय रूपयात महापालिकेस भरावी लागणार आहे. तसेच वाहन खरेदी कामी पेमेंट करणेसाठी लेटर ऑफ क्रेडिट (L.C.) काढणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास एक नग 70 मीटर अधिक वजा 10% उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहन खरेदी करण्यास व कस्टम ड्यूटी भरण्यास तसेच लेटर ऑफ क्रेडिट (L.C.) उघडून पेमेंट अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच 24 महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर वाहन उत्पादक कंपनीचे भारतातील अधिकृत देखभाल दुरूस्तीकार मे. जोसेफ लेस्ली ऍन्ड कंपनी एल.एल.पी. |

| | | |
|---|---|---|
| | | यांचेकडून वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील 3 वर्ष कालावधी करीता साहित्यासह देखभाल दुरूस्ती C.S.M.C. (Comprehensive Service Maintenance Contract) करण्यास व त्याबाबतचे होणारे देयक अदा करणेस व वाहन प्राप्त झालेनंतर वाहनाची विमा पॉलिसी काढण्यास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये कमी दराचे निविदाकार मे. मॅगिरस जीएमबीएच जर्मनी यांचेबरोबर संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 13 | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृह व मा.आयुक्त यांच्या कॉन्फरन्स रुम करीता इंटरॲक्टीव फ्लॅट पॅनल खरेदी करणेकामी ई - निविदा प्रक्रीयेद्वारे प्राप्त लघुत्तम दर मंजुर करुन लघुत्तम निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. इंटरॲक्टीव फ्लॅट पॅनल खरेदी करणेकामी लघुत्तम दराच्या निविदाकारांबरोबर संविदा करून साहित्य खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सचिन देसाई सूचक :- मा.श्री.प्रकाश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. 30/12/2019 ते दि.12/01/2020 व दि.13/01/2020 ते दि. 26/01/2020 या कालवधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समितीस सादर. | **ठराव** :- प्रस्तावात नमुद केलेनुसार उक्त कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनेचे प्रतिवृत्त जे माहितीसाठी सभेस दिलेले आहे, त्याचे सभेने अवलोकन केले व त्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्रीम.ज्योती धोंडेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई विरार शहर महानगरपालिका